# टेकडीवर वृक्षारोपण

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'फ्लीटगार्ड फिल्टर्स' कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी नेल्डा फाउंडेशनच्या सहकार्याने सेनापती बापट रस्त्यावरील हनुमान टेकडी येथे फुलझाडे लावली. नेल्डा फाउंडेशन पुढील वर्षभर झाडांचे संगोपन आणि संवर्धन करणार आहे. 'फ्लीटगार्ड'चे मुख्य वित्तीय संजय कुलकर्णी, सीएसआर विभागाच्या प्रमुख प्रियांका चव्हाण, अमृता जुन्नरकर, फाउंडेशनचे शुभम धुले आणि इतर कर्मचारी सहभागी झाले होते.